(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**बॉम्बे न्यायमंडळाच्या उच्च न्यायालयात**

**औरंगाबाद येथील खंडपीठ**

**फौजदारी अपील क्रमांक ९०१/२०१८**

**सह**

**अपील क्रमांक ९०१/२०१८ मधील अर्ज क्रमांक ४३०/२०२१**

१. दारासिंग @ मारुती वकील, भोसले, वय : ४९ वर्षे , व्यवसाय : मजूर , राहणार- धामणगाव, ता . आष्टी, जिल्हा बीड.

२. रमेश @ राज्या माधव @ धुराजी काळे, वय : ४३ वर्षे, व्यवसाय : मजूर , राहणार - ब्राह्मणगाव , ता . आष्टी, जिल्हा बीड.

३. बंड्या @ बान निलगिर्या @ उत्तम भोसले, वय : ४१ वर्षे, राहणार- वाळुंज, ता .गंगापूर जिल्हा औरंगाबाद.

४. हबीब @ हब्या पानमाळ्या भोसले वय : ४१ वर्षे, व्यवसाय : मजूर, राहणार - साबलखेड, ता. आष्टी, जिल्हा बीड.

५. गरमन्या खुबजात चव्हाण , वय : ४८ वर्षे , व्यवसाय : मजूर , राहणार-शोरी, ता . आष्टी, जिल्हा बीड.

६. राजू @ अज्ञान @ अशोक @ किल्या भोसले , वय : ३६ वर्षे, व्यवसाय : मजूर, राहणार- धामणगाव , ता. आष्टी, जिल्हा बीड.

७. उंब्र्या धनशा भोसले, वय : ४८ वर्षे, व्यवसाय : मजूर, राहणार- शोरी, ता. आष्टी, जिल्हा बीड.

८. रसाळ्या दिग्ग्या भोसले , वय : ४१ वर्षे, व्यवसाय : मजूर ,राहणार- चिखली, ता . आष्टी, जिल्हा बीड.

९. संतोष @ हरी सूर्यभान @ डिस्चार्ज काळे, वय : ३६ वर्षे, व्यवसाय : मजूर , राहणार- हिवरे पिंपरखेड , ता. आष्टी, जिल्हा बीड.

१०. सुरेश @ तिरशा @ तीनताश्या चिंतामण @ चिंचवन्या काळे, वय : ३२ वर्षे, व्यवसाय : मजूर, राहणार- शोरी , ता . आष्टी, जिल्हा बीड.

११. हनुमंत नक्षा भोसले वय : ३६ वर्षे, व्यवसाय : मजूर , राहणार- हिरे पिंपरखेड, ता . आष्टी, जिल्हा बीड.

१२. चिकू @ चिक्क्या @ विव्र्या सरमाळ्या भोसले, वय : ३५ वर्षे, राहणार- वाळुंज, ता . गंगापूर जिल्हा औरंगाबाद

---- अपीलार्थी

**विरुद्ध**

महाराष्ट्र राज्य

----उत्तरार्थी

....

अपीलकर्त्यांसाठी वकील : श्री . एन.एस.घाणेकर

उत्तरार्थी/ राज्यासाठी ए. पी. पी. :श्री . आर. बी. बागुल

....

**न्यायवृंद:** न्यायमूर्ती मंगेश एस. पाटील

**राखीव ठेवला : २९. ०७. २०२१**

**घोषित केला : ०३. ०८. २०२१**

**न्यायनिर्णय:**

सदर अपील हे विद्वान विशेष न्यायाधीश, एम. सी. ओ. सी.(MCOC), औरंगाबाद यांनी अपीलकर्त्यांना कलम ३(१) (ii) आणि कलम ३(४) अन्वये दोषी

ठरवून कलम ३(१) (ii) अन्वये १२ वर्षे कठोर कारावासाची शिक्षा आणि कलम ३(४) अन्वये १० वर्षे कठोर कारावासाची शिक्षा सुनावत आणि त्याव्यतिरिक्त प्रत्येकी रु . ५,००,०००/- दंड ठोठावत , व दंड न भरल्यास त्यांना प्रत्येक गुन्ह्यासाठी आणखी दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावल्यामुळे व्यथित आणि असमाधानी झाल्यामुळे महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम , १९९९ (यात यापुढे एम. सी. ओ. सी. अधिनियम) च्या कलम १२ अन्वये करण्यात आले आहे.

२. अपीलाकडे नेणारी तथ्ये खालीलप्रमाणे सारांशित केली जाऊ शकतातः

दिनांक १६. ०१. २००१ आणि १७. ०१. २००१ च्या मध्यरात्री अपीलकर्त्यांनी कोठेवाडी, ता. पाथर्डी, जिल्हा अहमदनगर या गावात दरोडा टाकला आणि त्यांनी काही महिलांवर बलात्कारही केला, ज्यासाठी भारतीय दंड संहितेच्या कलम ३९५ , ३४२ , ३७६(२) (जी), ३५४, ५०६(२) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी गुन्हा क्रमांक ०८/२००१ नोंदविण्यात आला. त्या गुन्ह्याच्या अन्वेषणादरम्यान असे दिसून आले की, अपीलकर्ते संघटित गुन्ह्यात सामील होते ज्यामध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले होते आणि न्यायालयांनी त्याची दखल घेतली होती.त्यानुसार कलम २३ अंतर्गत मान्यता मागितली गेली आणि सध्याचा गुन्हा नोंदवण्यात आला. अभियोग पक्षाने सर्व ११ साक्षीदारांची मुख्यतः मुद्द्याच्या आधारावर आणि आधीच्या गुन्ह्यांशी संबंधित तपासणी

केली.आक्षेपित निर्णयाद्वारे अपीलकर्त्यांना दोषी ठरवण्यात आले आहे आणि वर नमूद केल्याप्रमाणे शिक्षा सुनावण्यात आली आहे.

३. विद्वान वकील श्री. घाणेकर यांनी जोरदारपणे असे सांगितले की , एम. सी. ओ. सी. अधिनियमाच्या कलम ३ मध्ये कलम २ (१) (ई) अंतर्गत परिभाषित केल्यानुसार 'संघटित गुन्हेगारीसाठी' शिक्षेची तरतूद आहे आणि कलम २ (१) (डी) अंतर्गत परिभाषित केल्यानुसार 'चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्यात' सहभागी असल्याबद्दल नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, अपीलकर्त्यांना कोणत्याही ठोस गुन्ह्यासाठी आरोप न लावता त्या तरतुदीनुसार दोषी ठरवले जाऊ शकत नाही. ते असे सादर करतात की, चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य हा संघटित गुन्हा घडवण्याचा एक घटक असला तरी, संघटित गुन्हेगारी तयार करण्यासाठी, गुन्हेगार संघटित गुन्हेगारीच्या व्याख्येमध्ये वर्णन केलेल्या प्रकारच्या गुन्ह्यात सहभागी असणे आवश्यक आहे. त्यामुळे ते असे सादर करतात की, बेकायदेशीर कृत्य सुरू ठेवण्यात अपीलकर्त्यांचा सहभाग असल्याचा केवळ पुरावा त्यांना दोषी ठरवण्यासाठी पुरेसा नाही. ते असे सादर करतात की, हे मान्य आहे की, अपीलकर्त्यांवर सध्याच्या गुन्ह्यामध्ये कोणत्याही ठोस गुन्ह्यासाठी आरोप ठेवण्यात आलेले नाहीत आणि केवळ मागील वर्षांमध्ये बेकायदेशीर कृत्ये चालू ठेवल्याबद्दल त्यांना दोषी ठरवण्यात आले आहे.

४. विद्वान वकिलांनी असे निदर्शनास आणून दिले की, अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार बहुतेक अपीलकर्त्यांविरुद्ध नोंदवलेल्या पूर्वीच्या गुन्ह्यांशी संबंधित आहेत आणि कोणताही नवीन ठोस गुन्हा करत नाहीत. ते पुढे असे सादर करतात की, अपीलकर्त्यांवर पूर्वीच्या गुन्ह्यांसाठी रीतसर खटला चालवला गेला आहे आणि परिणामी त्या गुन्ह्यांसाठी त्यांच्यावर पुन्हा खटला चालवला जाऊ शकत नाही. ते असे सादर करतात की, जरी अपीलकर्त्यांचा अनेक गुन्ह्यांमध्ये सहभाग असला तरीही, त्या सर्व गुन्ह्यांसाठी त्यांच्यावर रीतसर खटला चालवला गेला आहे आणि निर्णय विचारात न घेता, हे पूर्वीचे सर्व गुन्हे केवळ कलम २ (१) (घ) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे बेकायदेशीर कृत्ये चालू ठेवण्यात ते कसे गुंतलेले आहेत हे दर्शवितात. तथापि, याव्यतिरिक्त, अभियोग पक्षाला हे सिद्ध करावे लागेल की, ते कलम २ (१) (ई) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे संघटित गुन्ह्यात गुंतलेले आहेत जे कलम ३ अंतर्गत दंडनीय आहे.

५. त्यांच्या निवेदनाच्या समर्थनार्थ विद्वान वकील श्री. घाणेकर हे या न्यायालयाच्या फौजदारी अपील क्र. ३०८/२००२, मदन रामकिसन गंगवाणी विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि संबंधित अपील दिनांक २६. ०३. २००९ रोजीच्या खंड न्यायाधीशमंडळाच्या निर्णयावर आणि फौजदारी अपील क्र.१८४ /२०१५ , पुंडलिक उकला पवार आणि इतर

विरुद्ध महाराष्ट्र राज्य  संबंधित अपीलांसह दिनांक १४.०७.२०२० रोजीच्या या न्यायालयाचा एकल खंडपीठाचा निर्णयावर भर देतात.

६. उलटपक्षी, विद्वान एपीपी असे  सादर करतात की, अपीलकर्ते बेकायदेशीर कृत्ये चालू ठेवण्यात कसे गुंतले आहेत हे दाखवण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत. अनेक प्रकरणांमध्ये त्यांचा सहभाग होता.जसे की, भरत शांतीलाल शहा विरुद्ध  महाराष्ट्र राज्य; २००३ ऑल  एम. आर. (क्रि.) १०६१ मध्ये अधिनिर्णित केल्याप्रमाणे दोषसिद्धी किंवा अन्यथा विसंगत आहे. संपरीक्षा न्यायालयाने पुराव्याचे अधिमूल्यन करून आणि अपीलकर्ते संघटित गुन्ह्यांमध्ये गुंतलेले असल्याचा निष्कर्ष काढत कोणतीही चूक किंवा बेकायदेशीरता केलेली नाही.

७. विद्वान ए. पी. पी. हे  गोविंद सखाराम उभे विरुद्ध महाराष्ट्र राज्य; २००९ ऑल एम. आर. (क्रि. ) १९०३  या न्यायालयाच्या निर्णयाचा आणि किशोर चांगदेव दंडवते विरुद्ध महाराष्ट्र राज्य;  फौजदारी अपील क्रमांक  २२२/२०१९  आणि सूर्यकांत उर्फ सुरेश  श्रीराम मुळे विरुद्ध  महाराष्ट्र राज्य आणि अन्य  ; फौजदारी अपील क्रमांक ३४/२०१९  मध्ये पारित केलेल्या आदेशाचा संदर्भ देतात.

८. मी प्रतिस्पर्धी निवेदनांचा विचार केला आहे आणि अभिलेखाचे अवलोकन केले आहे. या वस्तुस्थितीबद्दल कोणताही वाद नाही की, केवळ एम. सी. ओ. सी.

अधिनियमाच्या कलम ३ (१) (ii ) आणि ३ (४ ) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठीच अपीलकर्त्यांवर आरोप ठेवण्यात आले आहेत, त्यांच्यावर खटला चालवण्यात आला आहे आणि त्यांना दोषी ठरवण्यात आले आहे आणि त्यांच्यावर एकाच वेळी कोणत्याही ठोस गुन्ह्यासाठी आरोप ठेवण्यात आले नाहीत आणि त्यांच्यावर खटला चालवला गेला नाही. त्यामुळे जो मुद्दा निर्धारणासाठी उद्भवतो आणि जो प्रत्यक्षात यापुढे अनिर्णित विषय राहिलेला नाही, तो म्हणजे एखाद्या व्यक्तीला संघटित गुन्ह्याच्या गुन्ह्यासाठी ठोस गुन्हा न होता दोषी ठरवले जाऊ शकते की नाही.अशाच प्रकारचा युक्तिवाद मदन रामकिशन गंगवानी (उपरोक्त ) यांच्या प्रकरणात खंड न्यायाधीशमंडळासमोर मांडण्यात आला.यापूर्वीच्या प्रसंगी एकल बसलेल्या खंड न्यायाधीशमंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी घेतलेल्या वेगळ्या मतांचा संदर्भ देत खंड न्यायाधीशमंडळाने भरत शांतिलाल शाह (उपरोक्त ) यांच्या प्रकरणातील खालील निरीक्षणांचा संदर्भ दिलाः

"१९ . 'चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य ' च्या कलम २ (१ ) (घ ) मधील पुढील व्याख्येशी संबंधित असे सादर केले गेले की, ते अनुच्छेद १४ चे उल्लंघन करत आहे कारण ते असमानांना समान मानते. तीन वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा असलेल्या दखलपात्र गुन्ह्याचे एकापेक्षा जास्त आरोप सक्षम न्यायालयात दाखल केले गेल्यास ते बेकायदेशीर कृत्य चालू ठेवणारे कृत्य बनते, गुन्हेगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीने केलेल्या कृत्याचा समावेश चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य म्हणून

होत नाही परंतु जोपर्यंत त्याच्याविरुद्ध एकापेक्षा जास्त आरोपपत्रे दाखल होत नाहीत. एखाद्या गुन्ह्याचा दहा वेळा आरोप लावलेल्या व्यक्तीला प्रत्येक प्रसंगी निर्दोष सोडण्यात आले असले तरी तरीही त्याचा बेकायदेशीर कृत्य चालू ठेवणारी व्यक्ती म्हणून समावेश केला जाऊ शकतो. ज्याअर्थी एखाद्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांच्या शिक्षेची शिक्षा झालेल्या व्यक्तीवर अशा दोनपेक्षा जास्त गुन्ह्यांचा आरोप नसल्यास त्याचा या व्याख्येनुसार उल्लेख करता येणार नाही. म्हणून व्याख्येमध्ये त्या समान व्यक्ती मानल्या जातात, ज्या हताशपणे असमान आहेत .... प्रथमदर्शनी युक्तिवाद आकर्षक वाटतात, परंतु खोलवर विचार केल्यास युक्तिवादाचा पोकळपणा दिसून येतो.

२५. आमच्या मते, या व्याख्येनुसार अनुच्छेद १४ चे उल्लंघन होत नाही. जर आपण व्याख्या पुन्हा वाचली तर, चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य म्हणजे मागील दहा वर्षांच्या कालावधीत, एकापेक्षा अधिक आरोपपत्रे सक्षम न्यायाधिकारक्षेत्रापुढे दाखल करण्यात आलेली असतील असे संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून वारंवार केलेले अर्थात एकापेक्षा जास्त वेळा केलेले कायद्याद्वारे प्रतिषिद्ध ठरविण्यात आलेले कृत्य . चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य म्हणजे काय हे परिभाषित करणे हा व्याख्येचा उद्देश आहे आणि चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य म्हणजे काय हे परिभाषित करण्याच्या उद्देशाने हे आरोप विचारात घेतले पाहिजेत. केवळ हे आरोप विचारात घेतल्याने त्याची परिणीती श्री. मनोहर यांनी अभिकथित केलेल्या प्रकारात भेदभाव म्हणून होऊ शकत नाही. हे

कृत्य  चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य असले पाहिजे आणि त्याची स्पष्ट व्याख्या करण्यासाठी अशी तरतूद करण्यात आली आहे की, ज्या व्यक्तीवर यापूर्वी अशे कृत्य किंवा गुन्ह्याच्या एकापेक्षा जास्त आरोपांसाठी आरोपपत्र दाखल करण्यात आले होते, ज्याची दखल घेण्यात आली आहे आणि ज्याचा कारावास तीन वर्षांपेक्षा जास्त आहे, अशा कोणत्याही व्यक्तीचा विचार केला जावा.भूतकाळात अशा दखलपात्र गुन्ह्यांमध्ये त्या व्यक्तीवर आरोपपत्र दाखल केले गेले आहे ही वस्तुस्थिती बेकायदेशीर कृत्य हे  चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य  बनवते .हा विभाग केवळ कृत्य काय आहे ते परिभाषित करतो. ते स्वतः त्या कृत्यासाठी कोणत्याही शिक्षेची तरतूद करत नाही. शिक्षेमध्ये असमानांना समान म्हणून शिक्षा देताना जे सादरीकरण केले जाते ते प्रदान केले असते, तर त्याला महत्त्व असू शकते. अधिनियमाच्या कलम २ (१ ) (घ ) ला आव्हान देताना असे नसल्यामुळे आम्हाला व्याख्येनुसार अनुच्छेद १४ चे उल्लंघन किंवा अस्पष्टता दिसत नाही.आम्हाला असे आढळले आहे की ,या तरतुदीत समाविष्ट असलेल्या सर्वांशी समान पद्धतीने वागणूक दिली जाते आणि वर्गलक्ष्यी विधिविधानाच्या  दुष्परिणामांचा त्रास होत नाही.

२७. राज्यघटनेतील समानतेच्या खंडाचे उल्लंघन झाले आहे, या आव्हानातही आम्हांला काही तथ्य आढळत नाही, कारण आरोपातून निर्दोष मुक्तता झाली किंवा दोषसिद्धी झाली, याची पर्वा न करता, एकापेक्षा जास्त वेळा आरोप लावलेल्या कोणावरही ही

व्याख्या लागू होते.आरोपानंतर जी परिस्थिती निर्माण झाली ती महत्वपूर्ण नाही .या तरतुदीत केवळ चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्ये काय आहेत हे परिभाषित केले आहे आणि एखाद्या व्यक्तीवर पहिल्यांदा आरोप ठेवण्यात आले आहेत की वारंवार आरोप ठेवण्यात आले आहेत हे पाहण्याच्या उद्देशाने दहा वर्षांच्या कालावधीत आरोप ठेवण्यात आले आहेत की नाही याचा संदर्भ आहे.आरोपानंतरची दोषसिद्धी किंवा निर्दोष मुक्तता ही परिस्थिती महत्वपूर्ण नाही. मर्यादित उद्देश व्यक्तीची पूर्ववर्ती पाहणे हा आहे. सिद्धापराधीची नव्हे. "(भर देण्यात आला )

खंड न्यायाधीशमंडळाने परिच्छेद क्रमांक १०५ ते १०८ मध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष काढला:

"१०५. सध्याच्या प्रकरणात, उपस्थित केलेला प्रश्न 'संघटित गुन्हेगारी' च्या व्याख्येबद्दल असल्याने, सर्वोच्च न्यायालयाच्या या निरीक्षणांच्या पार्श्वभूमीवर, या संदर्भात भरत शाह यांच्या प्रकरणात या न्यायालयाने यापूर्वी उद्धृत केलेल्या निष्कर्षांचे पालन करावे लागेल असा निष्कर्ष काढणे अनुज्ञेय ठरेल.

१०६. या न्यायालयाने विशेषतः असे म्हटले होते की बेकायदेशीर कृत्य चालू ठेवल्याबद्दल शिक्षेची तरतूद केली गेली असेल तर, शिक्षा देताना, ते असमानांना समान मानतो, हे म्हणणे महत्त्वाचे ठरू शकते.न्यायालयाने " चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य " परिभाषित करणाऱ्या तरतुदीची वैधता कायम ठेवली कारण अधिनियमात त्या

कृत्यासाठी कोणत्याही शिक्षेची तरतूद केलेली नाही.परिच्छेद २७ मध्ये हे स्पष्ट करण्यात आले होते की बेकायदेशीर कृत्य सुरू ठेवण्याचा मर्यादित उद्देश व्यक्तीची पूर्ववर्ती पाहणे हा होता, सिद्धापराधीची नाही.

१०७. असा युक्तिवाद करण्यात आला की, या न्यायालयाने भरत शाह यांच्या प्रकरणातील निरीक्षणे या वस्तुस्थितीच्या संदर्भात वाचली पाहिजेत की, कलम २ हा एक व्याख्या खंड आहे जो फक्त गुन्ह्याची व्याख्या करतो, शिक्षा विहित करू शकत नाही, जी कलम ३ मध्ये विहीत करण्यात आली आहे .हे यथासत्य निष्कर्ष आहे की, कलम २ केवळ 'संघटित गुन्हेगारी' च्या गुन्ह्याचीच नव्हे तर अधिनियमात वापरल्या गेलेल्या इतर संज्ञांचीही व्याख्या करते. कलम २ मध्ये समाविष्ट केलेल्या इतर संज्ञांची व्याख्या नव्हे, तर 'संघटित गुन्हेगारी' च्या गुन्ह्याची व्याख्या महत्वाची आहे.'चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य' हा शब्द जर 'संघटित गुन्हेगारी' चा समानार्थी ठरला असता, तर विधिमंडळाला दोन व्याख्या समाविष्ट करण्याची आवश्यकता भासली नसती. बेकायदेशीर कृत्ये चालू ठेवण्याची केवळ एकच व्याख्या देणे आणि ते कृत्य दंडनीय करणे पुरेसे ठरले असते. कलम (घ ) आणि (ङ ) मधील व्याख्या स्पष्टपणे दर्शवतात की, संघटित गुन्हेगारीच्या घटकांपैकी एक म्हणजे बेकायदेशीर कृत्ये चालू ठेवणे आणि म्हणूनच संघटित गुन्हेगारी ही केवळ बेकायदेशीर कृत्ये चालू ठेवण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे.

१०८. अशा प्रकारे मागील दहा वर्षांच्या कालावधीत सक्षम न्यायालयात एकापेक्षा जास्त आरोपपत्र दाखल केले गेले आहेत आणि अशा न्यायालयाने अशा गुन्ह्याची दखल घेतली होती, ही वस्तुस्थिती संघटित गुन्हेगारीच्या गुन्ह्यातील घटकांपैकी केवळ एक घटक आहे.त्यामुळे, संघटित गुन्हेगारीचा गुन्हा पूर्वीच्या गुन्हेगारी कृत्यांच्या संकलनातून पूर्ण होतो असा युक्तिवाद केला जाऊ शकत नाही. (भर देण्यात आला )

आणखी परिच्छेद क्रमांक १०९ जयसिंग अशरफिलाल यादव आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि अन्य ; २००३ ऑल एम . आर . (क्रि.) १५०६ या प्रकरणातील खंड न्यायाधीशमंडळाची निरीक्षणे; ज्यात या निष्कर्षासह उद्धृत केले गेले आहे की, ही निरीक्षणे देखील संघटित गुन्हेगारीचा गुन्हा स्थापित करण्यासाठी केवळ बेकायदेशीर कृत्य चालू ठेवण्यापेक्षा काहीतरी अधिक आवश्यक आहे या निवेदनास पुष्टी देतात. हे लक्षात घेणे समयोचित आहे की, दिनेश महादेव भोंडवे विरुद्ध महाराष्ट्र राज्य; २००७ (२) एम एच . एल . जे (क्रि.) ७१८ या प्रकरणातील एकल न्यायाधीशाचे निरीक्षण आणि निष्कर्षदेखील याउलट चुकीचे असल्याचे मानले गेले.

परिच्छेद क्रमांक १५ मधील निष्कर्ष सारांशित करताना, खालीलप्रमाणे लक्षात आले आहे :

"११५. कायद्याच्या तरतुदी संपूर्णपणे वाचल्या गेल्यास, पूर्वगामी चर्चेच्या प्रकाशात, मागील दहा वर्षांत एकापेक्षा जास्त आरोपपत्रांद्वारे पुरावा दिलेली बेकायदेशीर कृत्ये चालू

ठेवण्याव्यतिरिक्त, किमान एक प्रसंग सुरू ठेवल्याने 'संघटित गुन्हेगारी' चा गुन्हा तयार होतो हे ते दर्शवतील.: हे असे आहे कारण:

(क) जर "संघटित गुन्हेगारी" हा "चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य" चा समानार्थी शब्द असेल, तर दोन स्वतंत्र व्याख्यांची आवश्यकता नव्हती.

(ख) व्याख्या स्वतःच दर्शवतात की आर्थिक फायदा मिळवण्याच्या उद्देशाने अशा कृत्यांमध्ये हिंसाचाराचा वापर करण्याचे घटक "चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य" च्या व्याख्येत समाविष्ट केलेले नाहीत, परंतु केवळ " संघटित गुन्हेगारी" च्या व्याख्येत स्थान मिळवतात.

(ग) कलम ३ अंतर्गत जे दंडनीय केले गेले आहे ते " संघटित गुन्हेगारी" आहे आणि "चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य" नाही.

(घ) जर" संघटित गुन्हेगारी"  हा केवळ एकापेक्षा जास्त आरोपपत्रांचा संदर्भ देत असेल, तर कलम ३(१) (i) आणि ३(१) (ii) मधील गुन्ह्याचे वर्गीकरण, परिणामी मृत्यू किंवा अन्यथा झालेल्या परिणामाच्या आधारे, 'अशा कोणत्याही गुन्ह्याचा परिणाम मृत्यू झाला असेल तर' अशी तरतूद करून, वेगळे केले गेले असते, कारण चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्यासाठी एकापेक्षा जास्त गुन्ह्यांची आवश्यकता असते.कलम ३(१) मधील "अशा अपराधाचा " संदर्भ विशिष्ट कृताकृत सूचित करतो.

(ङ) जर संघटित गुन्हेगारीच्या गुन्ह्यातच पूर्वीच्या गुन्ह्यांचा समावेश असेल, ज्यांच्या संदर्भात आरोपपत्र दाखल केले गेले आहे, किंवा दुसऱ्या शब्दांत, असे आरोपपत्र संघटित गुन्हेगारीच्या गुन्ह्याचा एक घटक असेल, तर अशा आरोपपत्रांमध्ये नमूद केलेल्या अशा सर्व गुन्ह्यांचा खटला एकाच खटल्यात चालवला जाऊ शकतो आणि त्याच खटल्यात संहिता अंतर्गत आरोपींच्या खटल्याबद्दल कलम ७ मध्ये नमूद विधेयक पुस्ती अनवश्याधिक ठरेल.

(च) दोन आरोपपत्रे दाखल करण्याच्या पुराव्यांद्वारे पुरावा दिलेले ' चालू ठेवलेले बेकायदेशीर कृत्य' हे संघटित गुन्ह्याच्या बरोबरीचे असल्यास अधिनियमाचे संपूर्ण कलम १८ अनवश्याधिक ठरेल , कारण कबुलीजबाब अभिलेखनवण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.आरोपपत्रांच्या प्रमाणित प्रती आणि त्यावर न्यायालयाने दखल घेतलेल्या आदेशाच्या प्रमाणित प्रती औपचारिक पुराव्याशिवाय अनुज्ञेय होतील आणि जर तेच स्वतःच गुन्हा ठरवण्यासाठी पुरेसे असेल तर इतर कोणत्याही पुरावा प्रदत्त करण्याची आवश्यकता भासणार नाही.

(छ) याच कारणास्तव, कोणत्याही साक्षीदाराची चौकशी करण्याची आवश्यकता असू शकत नाही आणि परिणामी कलम १९ अनवश्याधिक ठरेल.

(ज) दोन आरोपपत्रे दाखल करण्याचा पुरावा संघटित गुन्हेगारीचा अपराध प्रस्थापित करण्यासाठी पुरेसा असेल तर, आरोपपत्रांच्या प्रती गोळा करण्याव्यतिरिक्त कोणताही तपास करण्याची संधी असू शकत नाही. परिणामी, उच्च दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्यांना अशी आरोपपत्रे गोळा केल्यावर माहिती अभिलेखनवण्याची परवानगी देणे किंवा अभियोग चालवण्यास परवानगी देणे हे अनावश्यक असेल.

९. अलीकडेच या न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी पुंडलिक उकला पवार (उपरोक्त) यांच्या प्रकरणात यद्यपि मदन रामकिशन गंगवानी (उपरोक्त) यांच्या प्रकरणातील खंड न्यायाधीशमंडळाच्या निकालाचा संदर्भ न देता असेच मत मांडले आहे.

अत्यंत आदराने, गोविंद सखाराम उभे (उपरोक्त) याच्या प्रकरणातील निर्णय, एखाद्या व्यक्तीला एकाच वेळी काही ठोस गुन्ह्यासाठी दोषी न ठरवता, कलम ३अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी खटला चालवला जाऊ शकतो आणि दोषी ठरवले जाऊ शकते की नाही हे थेट हाताळत नाही आणि या समस्येवर निर्णय घेत नाही. अगदी किशोर चांगदेव दंडवते आणि सूर्यकांत @सुरेश श्रीराम मुळे (उपरोक्त) विशेषत: हा विषय हाताळत नाहीत. शिवाय या तिन्ही प्रकरणांत खंड न्यायाधीशमंडळांसमोर केवळ आरोपीच्या दोषमुक्तीच्या विनंतीवर विचार करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. अगदी

गोविंद सखाराम उभे, किशोर चांगदेव दंडवते आणि सूर्यकांत @सुरेश श्रीराम मुळे (उपरोक्त) या प्रकरणांचा निर्णय देणाऱ्या कोणत्याही खंड न्यायाधीशमंडळांसमोर मदन रामकिशन गंगवानीच्या (उपरोक्त) प्रकरणातील निर्णय, जो पूर्ववर्ती निर्णय आहे, त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

१०. वरील चर्चेचा परिणाम असा आहे की, अपीलकर्त्यांवर केवळ कलम ३(१) (ii ) आणि ३(४) अंतर्गत कोणत्याही ठोस गुन्ह्याशिवाय दंडनीय गुन्ह्यासाठी आरोप ठेवण्यात आले आणि त्यांच्यावर खटला चालवण्यात आला. कलम २(१) (ङ) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे संघटित गुन्हेगारीच्या प्रकरणात चालू ठेवलेल्या बेकायदेशीर कृत्यांना वाढवण्यासाठी इतर कोणत्याही गुन्ह्यात सहभागी न होता अनेक गुन्ह्यांमध्ये सामील होणे पुरेसे ठरणार नाही. त्यामुळे अपीलकर्त्यांना केवळ कलम ३(१) (ii) आणि ३(४) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी कोणताही ठोस गुन्हा नसताना दोषी ठरवता आले नसते आणि शिक्षा होऊ शकली नसती जेणेकरुन संघटित गुन्हेगारी ठरू शकेल . विशेष न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी या सर्व पैलूंचा विचार केला नाही आणि अपीलकर्त्यांना केवळ बेकायदेशीर कृत्य चालू ठेवण्यात गुंतल्याबद्दल दोषी ठरवले आणि शिक्षा ठोठावली आहे जी स्वतःच एम. सी. ओ. सी. (MCOC) अधिनियमानुसार शिक्षेस पात्र ठरलेला गुन्हा नाही.

११. वरील बाबी लक्षात घेता, अपील मान्य करण्यास पात्र आहे आणि त्यानुसार त्याला मान्यता देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांना दोषी ठरवणारा आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश रद्दबातल ठरवून बाजूला सारण्यात येत आहे. एम. सी. ओ. सी. (MCOC), अधिनियमाच्या कलम ३(१) (ii) आणि ३(४) नुसार शिक्षापात्र गुन्ह्यांमधून त्यांची निर्दोष मुक्तता केली जाते. इतर कोणत्याही गुन्ह्यात आवश्यकता नसल्यास त्यांची सुटका करण्यात यावी . दंडाची रक्कम भरलेली असल्यास, ती त्यांना परत केली जावी.

१२. फौजदारी अर्ज क्रमांक ४३०/२०२१ निकाली काढण्यात आला आहे.

( न्यायमूर्ती मंगेश एस. पाटील )

****

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

****